हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात **पंडित संजीव अभ्यंकर** एक अत्यंत प्रतिभाशाली गायक म्हणून प्रसिद्ध आहेत. आपल्या असामान्य प्रतिभेच्या जोरावर व तीन दशकांहून अधिक काळ केलेल्या साधनेचे फळ म्हणून आज शास्त्रीय गायनाच्या क्षेत्रात त्यांनी आंतरराष्ट्रीय कीर्ति प्राप्त केलेली आहे.

संजीव अभ्यंकरांचा जन्म १९६९ साली झाला. त्यांचे संगीताचे शिक्षण वयाच्या आठव्या वर्षापासून, प्रथम त्यांच्या मातोश्री, डॉ. सौ. शोभा अभ्यंकर व पं. गंगाधरबुवा पिंपळखरे यांच्याकडे आणि त्यानंतर मेवाती घराण्याचे मूर्धन्य गायक पद्मविभूषण संगीत मार्तंड पंडित जसराजजींकडे गुरु - शिष्य परंपरेनुसार झाले.

वयाच्या अकराव्या वर्षी मुंबईत प्रथम जाहीर कार्यक्रम सादर करून ''वंडरबॉय'' म्हणून त्यांच्या दैदीप्यमान कारकीर्दीची सुरवात झाली. भारताच्या कानाकोप-यातील सर्व प्रमुख सभा समारंभात त्यांनी आपले गायन सादर केले आहे. परदेशात अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, युरोप, सेशल्स व मध्य-पूर्व देशांतही त्यांचे कार्यक्रम होत असतात. त्यांना मिळालेल्या प्रचंड रसिकमान्यतेचे फळ म्हणून आजपर्यंत जगभरातील दोनशेहून अधिक निरनिराळ्या शहरात त्यांचे अनेक कार्यक्रम झालेले आहेत.

लहान वयापासूनच अनेक मान सन्मान त्यांना प्राप्त झालेले आहेत. यात प्रामुख्याने मध्य प्रदेश सरकारचा पं. कुमार गंधर्व राष्ट्रीय सन्मान, 'गॉडमदर' या चित्रपटातील पार्श्वगायनासाठीचा सर्वोत्कृष्ट पार्श्वगायकाचा राष्ट्रीय पुरस्कार, फाय फाऊंडेशनचा राष्ट्रीय पुरस्कार, 'सूररत्न' ही उपाधी, आकाशवाणी तर्फे राष्ट्रपती पदक आणि पं. जसराज गौरव पुरस्कार यांचा समावेश आहे.

सर्व नामवंत कंपन्यांनी प्रकाशित केलेल्या त्यांच्या अनेक सीडीज् जगभरात प्रसिद्ध आहेत. शास्त्रीय गायनाबरोबरच हिंदी, मराठी, तामिळ व संस्कृत भक्तीगायन तसेच पार्श्वगायनातही आपल्या प्रतिभेचा आविष्कार करून, असामान्य कर्तृत्वाने त्यांनी तरुण पिढीसमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

महाराष्ट्र शासनानी ऑडिओ बुकसाठी समर्थ रामदासस्वामींचा ७८०० ओव्यांचा संपूर्ण दासबोध, संजीवजींच्या आवाजात रेकॉर्ड केला आहे.